NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार आणि शैक्षणिक सुधारणा

**श्री किरण चंद्रशेखर कानडे,** श्रीमती अ. रा. पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी
मो. 8806443231, kckanade2211@gmail.com

---

**प्रस्तावना:**

विसाव्या शतकाच्या पहिल्या एक-दोन दशकात ज्यांच्या ठिकाणी राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रधर्म, राष्ट्रीय शील, धर्मनिरपेक्षता, आधी राष्ट्रवादी भावना उत्पन्न झाल्या होत्या. अशा मोजक्याच भारतीय नेत्यांमध्ये शाहू महाराजांची गणना केली जाते. केवळ राष्ट्राची निर्मिती करून भागणार नाही. तर त्या राष्ट्रातील नागरिकांचे राष्ट्रीय शील निर्माण व्हायला हवे. समाजाची नीतिमत्ता वाढावी असे त्यांचे मत होते. जातीयता, अनिष्ट चालीरीती, धर्मभोळेपणा यांच्या मुळे तत्कालीन समाजात बहुजनांच्या अधोगतीस कारणीभूत अनेक घातक प्रकार रूढ होऊन त्यापासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनती झाली होती. ही अवनती दूर करण्यासाठी समाजातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत शिक्षणाची गंगा वाहिली पाहिजे हे ध्येय डोळयासमोर ठेवून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील वाडी वस्तीवर शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे क्रांतिकारक केले. तत्कालीन समाजात धर्म, धर्माचे प्राबल्य, सवर्ण,दिन, दलित, बहुजन असा सर्व थरात समाज विभागला होता. समाज लोकरूढी प्रथा परंपरा अंधश्रद्धा यामध्ये अडकलेल्या समाजास मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, जनमानसात जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हे शाहू महाराजांनी रयतेस पटवून दिले. या कामी ते यशस्वी झालेचे ही दिसून येते. त्यांच्या शिक्षण विषयक कार्यावर महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. महात्मा फुले यांच्या

'विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली; नितीविना गती गेली; गतीविना वित्त गेले;
वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले' नुसार,

'अविद्ये'मुळेच बहुजन समाज मागास राहिला होता हे महाराजांनी पक्कं जाणलं होतं. महात्मा फुल्यांच्या समाजसुधारणा व शैक्षणिक कार्याचा वारसा पुढे नेत आपल्या संस्थानात महाराजांनी शिक्षण प्रसाराचे बहुमोल कार्य केले. सदर शोध निबंधाच्या माध्यमातून शाहू महाराजांच्या याच शैक्षणिक विचारांचा आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**शाहूंची शिक्षण विषयक मोहीम**

शिक्षणाबाबत महाराज म्हणतात की, शिक्षण म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे शिक्षण. शिक्षणाच्या मध्यमातूनच शोषण मुक्त समाज निर्माण करता येईल अशी शाहूंची धारणा होती. शिक्षण हे असे साधन आहे की ज्याच्या माध्यमातून मानवाच्या मानवावरती- मानवी मूल्यांची जाणीव करून देऊन ती समाजमनावर बिंबवता येतील. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव, एकात्मता तसेच व्यक्ती स्नेहिष्णुता ही सामाजिक मूल्य तसेच समाजाप्रती आपले हक्क आणि आपली कर्तव्य यांची जाणीव रयतेस व्हावयास हवी आणि आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी प्रथम सर्वच समाजाला शिक्षण द्यावी लागते. शिक्षणातून एकात्म समाज निर्माण होऊ शकतो यावर शाहूंचा ठाम विश्वास होता. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे शिक्षणामुळे मनुष्याच्या विचारांची बैठक तयार होते. शिक्षण म्हणजे मानवी जीवनशक्तीची प्रेरणा आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेचा विकास होणे अतिशय महत्त्वाचे आहे. शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धाराची चळवळ उभारली. सर्व प्रकारच्या दैन्य दुःखाच्या पाठीमागे शिक्षणाचा अभाव हे निखळ कारण स्पष्ट झाले होते .यातूनच पुढे महाराजांनी आपल्या संस्थानातील शिक्षण व्यवस्थेबद्दल जाणून घ्यावयास सुरुवात केली.

**शाहू महाराजांचे शिक्षण व शिक्षण विषयक विचार**

शाहू महाराज शिक्षणाचे भोक्ते होते. त्यांना सर्वच प्रकारचे शिक्षण घेण्याचा ध्यास होता. महाराज पाश्चात्य संस्कृतीचे चाहते होते. पाश्चात्य ज्ञान आपणही घेतले पाहिजे व त्याचा वापर सर्वांसाठी झाला पाहिजे यावर त्यांचा मोठा भर होता.पाश्चात्यांच्या ठिकाणी असणाऱ्या अनेक गुणांचे आपण अनुकरण केले पाहिजे असे त्यांना वाटे. पण त्याबरोबरच आपल्या संस्कृतीकडे, परंपरेकडे पाठ करून पाश्चात्य संस्कृतीचे सरसहा अंधानूकरण करावे असे त्यांना वाटत नसे. शाहू महाराजांना शिक्षण देणारे गोखले, सबनिस, फ्रेझर आधी व्यक्ती निष्णात शिक्षक व पंडित होते, त्यामुळे त्यांचा शिक्षणाचा पाया मजबूत झाला इंग्रजी साहित्य, सामाजिक शास्त्र, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. पूर्वी संस्थानिकांच्या मुला मुलींच्या शिक्षणासाठी युरोपियन गव्हर्नन्स ठेवण्याची पद्धत होती या गव्हर्निस कडून राजकुमार

राजकन्या यांना पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीचे ज्ञान दिले जाईल पण याबरोबरच त्यांना भारतीय शिक्षण व संस्कृतीचे ज्ञान देण्याची व्यवस्था केली गेली नाही तर ही मुले आपल्या संस्कृतीची धर्माची व पर्यायाने देश बांधवांची टेहाळणी करणारी निर्माण होतील आणि हा पाश्चात्य शिक्षणाचा सर्वात धोकेबाज परिणाम आहे. असे महाराजांना वाटत असे खुद्द महाराजांनी दोन्ही पद्धतीचे शिक्षण घेतले होते व याचा त्यांच्या आयुष्यात किती उपयोग होतो आहे याचा अनुभव ही घेतला. देशातील लोकांना पाश्चात्य शिक्षण मिळावे पण त्या शिक्षणाने लोकांचा विपर्यास होऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

**गाव तिथे शाळा**

संस्थानांतील लोकांच्या दयनीय अवस्थेला त्यांची निरक्षरता कारणीभूत आहे. ही निरक्षरता दूर करण्यसाठी समाजामध्ये शिक्षणाचे बीज पेरले. त्यांनी राज्यातील प्रत्येक व्यक्ती शिकला पाहिजे या उद्देशाने संपूर्ण राज्यात सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळांची व्यवस्था केली. त्यासाठी कुशल शिक्षक वर्ग देखील त्यांनी नेमला. शाहू महाराजांनी धार्मिक, सामाजिक व राजकीय अशा विविध प्रकारच्या चळवळी केल्या मात्र शिक्षण प्रसार दृष्टी आड होऊ दिला नाही. राज्यकारभार हाती घेतल्यापासून ते आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत (१८८४-१९२२) शिक्षण प्रसार हा त्यांचा शाहूंचा निधीध्यास होता. त्यांनी स्वतः आणि शैक्षणिक संस्था स्थापन करणाऱ्यांना सढळ हाताने मदत केली. गाव तिथे शाळा हा मानस त्यांचा होता ज्या गावची लोकसंख्या 500 ते 1000 पर्यंत आहे अशा प्रत्येक गावामध्ये शाळा चालू करून प्राथमिक माध्यमिक शिक्षणाची सोय करणे हा त्यांचा मानस होता. तत्कालीन समाजातील करवीरची शैक्षणिक स्थिती ही अतिशय कमकुवत होती. संस्थानात सर्व प्रकारच्या मिळून 224 शाळांची संख्या होती एकूण 14,819 विद्यार्थी होते. लोकसंख्या 9,10,000 इतकी होती करवीर राज्याचे एकूण उत्पन्न 38 लाख 90 हजार 85 रुपये आणि शिक्षणावरचा खर्च 1 लाख 45 हजार 720 रुपये एकूण लोकसंख्येच्या 1.62% लोक शिकत होते व एकूण शिक्षणावरील खर्च 3.75% इतका होता. ही स्थिती बदलण्यासाठी म्हणून शाहूंनी निखराचे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**शाहू महाराजांनी शैक्षणिक सुधारणेसाठी केलेल्या तरतुदी :**

1) **प्राथमिक शिक्षणाचा कायदा**

राज्यामध्ये सर्वत्र निरक्षरताच होती बहुजनातील ही निरक्षरता नष्ट करण्यासाठी जालीम उपाय करण्याशिवाय गत्यंतर नाही या उद्देशाने मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण योजना 1915-16 साली सुरू करण्यात आली.यातूनच पुढे शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षणासाठी कायदा करून घेतला. 29 सप्टेंबर 1917 रोजी हा कायदा संपूर्ण करवीर संस्थानांमध्ये लागू करण्यात आला या कायद्यानुसार प्रत्येकाने कमीत कमी प्राथमिक शिक्षण घेतले पाहिजे हा होता. आमच्याकडे आमच्या महाराष्ट्र शासनाने 2005 सली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत हा कायदा केला पण शंभर वर्षा अगोदर आमच्या राजांनी हा कायदा करून जनतेला शिक्षणाचे दारी मोकळी केलेली दिसून येतात त्यामुळे संस्थानातील प्रत्येकाने कमीत कमी प्राथमिक शिक्षण तरी घेणे गरजेचे आहे यावर त्यांचा मोठ्या प्रमाणात भर होता

**2) फी माफी**

शाहूंनी शिक्षण प्रसारसाठी विविध उपाय योजना केल्या पैकी एक म्हणजे शैक्षणिक शुल्क माफी होय महाराजांनी समाजातील वंचितांना शिक्षनाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येक शाळेतील गरजू व गरीब अशा 15 विद्यार्थ्यांना फी माफी देण्याची योजना सुरू केली त्याला फ्री शिप असे म्हणतात. 20 मे १९११ रोजी आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्यांना ही माफी करण्यासाठी पाऊल उचलले.

**3) दंडात्मक तरतूद**

शाहू महाराजांनी तत्कालीन परिस्थितीत ज्या कुटुंबातून मुलं शाळेत येणार नाहीत अशा कुटुंबांना दरमहा एक रुपयाचा दंड भरावा लागेल अशी तरतूद केली. या पाठीमागचा मुख्य उद्देश हा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये यावे हाच होता त्यामुळे त्यांनी दंडात्मक कारवाईचा नियम आपल्या संस्थानात लागू केला.

**4) शिक्षणाधिकारी पदाची निर्मिती**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील शैक्षणिक कारभार सुस्थितीत सुव्यवस्थित चालावा यासाठी शिक्षण खाते या स्वतंत्र विभागाची निर्मिती केली. पूर्वीचे उपशिक्षणाधिकारी हे पद रद्द करून त्याच्या ऐवजी शिक्षणाधिकारी या पदाची निर्मिती केली. संपूर्ण राज्यातील शाळांची जबाबदारी या शिक्षण अधिकाऱ्यावर सोपवली. शिक्षण अधिकाऱ्यास मदतनीस म्हणून दोन सामान्य दर्जाचे नायब शिक्षण अधिकारी ही पदे मंजूर केलीत व त्यांना सर्व हक्क अधिकार देण्यात आले

**5) शाळापंच पद्धती**

राज्यातील संस्थानातील संपूर्ण शाळांची जबाबदारी ही त्या शाळा ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी जनतेच्या

हातामध्ये सोपवण्यात आली शाळापंच च्या माध्यमातून शिक्षण प्रसाराच्या व शाळेच्या एकूणच कारभाराच्या दृष्टीने शाहूंनी शाळावर नजर ठेवणे विद्यार्थ्यांना शाळेस प्रोत्साहित करणे जनतेच्या थराथरामध्ये शिक्षण प्रसाराचे काम या शाळा पंचांच्यावर सोपवण्यात आली. गावच्या शाळेची जोखीम गावावरच त्यांनी टाकलेली दिसून येते. शाळापंच यांच्या माध्यमातून त्यांनी शाळांचा व पर्यायाने गावांचा विकास करण्यावर मोठा भर दिला गावामध्ये शाळा सुरू करत असताना शाळेस इमारत नसेल अशा शाळा मंदिर धर्मशाळा अशा ठिकाणी सुरू कराव्यात व यथावकाश शाळेची इमारत बांधून घ्यावी अशा पद्धतीच्या सूचना या गावपंचांना देण्यात आल्या आणि एकूणच शाळेची देखभाल ची जबाबदारी ज्या शाळा पंचांच्यावर देण्यात आली

**6) दोन सगळ्या वेगळ्या शाळा** शाहू महाराजांनी पाटील शाळा व सत्यशोधक शाळा सुरू केल्या

**अ) पाटील शाळा**

१२ मे 1912 रोजी पाटील शाळा सुरू झाली. या शाळेत पाटलाला गाव कारभार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचे ज्ञान देण्याची व्यवस्था केली होती. पाटील हा अडाणी तसेच अंगठा बहादूर असे. त्याला गाव कारभार करण्यासाठी कुलकर्णींची मदत घ्यावी लागत असे. 'कलम बहाद्दर कुलकर्ण्यास मिळाले मोकळे रान आणि रयत झाली हैराण' यावर तोडगा म्हणून या पाटील शाळा सुरू करण्यात आल्या

**ब) सत्यशोधक शाळा**

पाटील शाळेसारखेच सत्यशोधक शाळा ही देखील गरजेतून निर्माण झाली. पुरोहितांच्या चढेल वागणुकीमुळे आपल्याच लोकांमधून लग्न, मुंज, श्रावणी, सत्यनारायण हे करून घेण्याचे प्रमाण वाढीस लागले होते. हे धार्मिक विधी कसे करावेत त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान मिळावे यासाठी सत्यशोधक शाळा निर्माण केली.

**क ) स्त्री शिक्षण**

स्त्री शिक्षण छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या शिक्षणाला देखील मोठ्या प्रमाणात चालना दिलेली दिसते. संस्थानिकांच्या मुला मुलींच्या बरोबर सर्वसामान्य जनतेलाही शिक्षणाचा अधिकार आहे असे त्यांचे मत होते. मुलींच्या शिक्षणाबाबत ते म्हणतात की, एक मुलगी शिकली म्हणजे ती दोन्ही घरचा उद्धार करते. सोलापूरचे कलेक्टर मिस्टर बोनस यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की, 'आपल्या घरच्या मुली लग्नानंतर दुसऱ्याच्या घरी गेल्यावर मग ते घर पुराणमतवादी विचारांचे असो वा सुधारमतवादी विचारांचे असो. तेथे त्यांच्या वागण्याने सर्वांना प्रिय व्हाव्यात व त्यांचे आयुष्य सुखी व्हावे यासाठी त्यांना घराण्याच्या चाली रीती, रुढी, परंपरा, संस्कार, धार्मिक, परंपरा इत्यादीचे मूलभूत ज्ञान आवश्यक आहे. यासाठी पाश्चात्य शिक्षणाबरोबरच पारंपारिक भारतीय शिक्षणही महत्त्वाचे आहे.' आपले पुत्र संभाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी इंदुमती यांना तपोवन या ठिकाणी ठेवून तिथे त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले, त्यांना आत्मनिर्भर बनवले, तसेच त्यांना संस्थानातील शिक्षण खाते त्यांच्याकडे द्यायचे होते पण त्यांच्या मृत्यूमुळे महाराजांचा हा मनसुबा पुरा झाला नाही. स्त्री शिक्षणात मुलींना त्यांनी फी माफीची सवलत देखील जाहीर केली होती. संस्थांच्या शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमंत रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा तसेच समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडून येतो असे त्यांचे मत होते

**ड) उच्च शिक्षण, व्यवसाय शिक्षण व तांत्रिक शिक्षण**

प्राथमिक शिक्षणाबरोबरच छत्रपतींनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाला महत्त्व दिले 1851 सली सुरू झालेल्या इंग्रजी शाळेचे रूपांतर 1881 सली राजाराम महाविद्यालयात केले. व् याचा सर्व खर्च संस्थानातून दिला. प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले त्यामुळेच पाटीलशाळा, तलाठीस्कूल निर्माण केले. याशाळा मधूनच पाटील, तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था टिकवणे, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले. शिक्षकासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू केली तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकम, गवंडीकाम, सुतारकाम यासारख्या अनेक विषयाचे शिक्षण दिले जाऊ लागले. विद्यार्थ्यांना लष्करी जीवन विषयी आवड निर्माण व्हावी म्हणून 'इन्फंट्री स्कूल' सुरू केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण केली. या विविध शिक्षण संस्थाद्वारे बहुजन समाजाला विविध अंगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांना द्यावे लागते.

**इ) वसतीगृह**

राज्याच्या विकासामध्ये शिकलेली पिढीच मोठे योगदान देऊ शकते. पण तत्कालीन परिस्थितीमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी

विद्यार्थ्यांना मैलोन मैल पायपीट करावी लागत होती. किंबहुना प्राथमिक शिक्षणानंतर शिकण्याची इच्छा असूनही शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. शिक्षणाला राम राम ठोकावा लागत होता. ही गोष्ट डोळ्यासमोर ठेवून व उच्च विद्याविभूषित वर्ग निर्माण करावयाचा असेल तर विद्यार्थ्यांसाठी राहणे व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल. याच्यातूनच महाराजांनी वसतीगृहांची निर्मिती केली. ही वसतीगृह निर्माण करण्यापाठीमागील दुसराही महत्त्वाचा उद्देश म्हणजे अनेक जातीपातीची विद्यार्थी एकत्र येऊन एकत्रितरीत्या शिक्षण घेतील. पण ज्या उद्देशाने ही वसतीगृह चालू केली होती. ती सवर्णांच्या हातामध्ये गेली परिणामी बहुजन विद्यार्थ्यांना ही वसतीगृह रिकामी करावी लागली. शिक्षण घेताना सर्वांनी एकत्र येऊन राहून घ्यावे ही अपेक्षा शाहू महाराजांची होती, पण असे घडले नाही. परिणामी नाईलाजास्तव महाराजांना धर्म व जातीवार वसतीगृहांची निर्मिती करावी लागली. यामध्ये मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, मुस्लीम बोर्डिंग तसेच लिंगायत बोर्डिंग सुरु केले. यामध्ये त्यांचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. शाहूच्या या शैक्षणिक कार्यामुळेच संपूर्ण देशात कोल्हापूर हे वसतिगृहांची जननी म्हणून नावारूपाला आले.

**छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे परिणाम.**

1) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांना शिक्षणाची दारे खुली केली.

2) शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचल्यामुळे बहुजन वर्ग शिकू लागला. त्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळाली .

3) भारतीय समाजव्यवस्थेतील शिक्षणातील सवर्णांची (ब्राह्मणांची) मक्तेदारी मोडीत निघण्यास मदत झाली.

4) शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली. शिक्षणातून त्यांचे सक्षमीकरणास होण्यास मदत झाली.

5) शिक्षण समाज उन्नतीचे प्रभावी साधन आहे हे महाराजांनी त्यांच्या कार्यातून पटवून दिले.

6) शाहू महाराजांच्या शैक्षणिक सुधारणांमुळे बहुजन समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगती होण्यास मदत झाली.

7) भारतीय समाजव्यवस्थेत पिढ्यानपिढ्या शिक्षण हक्क नाकारलेल्या दलित, अस्पृश्य, आदिवासी यांना शिक्षण खुले करून त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे क्रांतिकारक कार्य शाहू महाराजांनी केले.

८) दलित, पिडीत, वंचित, शोषित, गरीब बहुजन यांच्या आजच्या सर्वांगीण प्रगतीचे श्रेय शाहू महाराजांना जाते.

**सारांश**

शाहू महाराजांनी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखलं होतं. शिक्षणाच्या जोरावरच बहुजन समाजाचा विकास होऊ शकतो. ही दूरदृष्टी ठेवून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये शिक्षण व्यवस्था बळकट करण्याचं काम केले. आज 21व्या शतकामध्ये वावरत असताना पुन्हा शाहूंच्या शिक्षण विषयक कार्याची आणि विचारांची जाणीव प्रकर्षाने होते. आज शिक्षणाची अवस्था खरंच बिकट बनत चालली आहे. आजचे शिक्षण हे श्रीमंतांची मक्तेदारी बनत चालले आहे. शैक्षणिक धोरणे सतत बदलत आहेत. शिक्षण महाग होत चालले आहे. ते सर्वसामान्यांच्या हाताबाहेर चालले आहे. आर्थिक कुवत नसल्यामुळे दलित, आदिवासी, गोरगरीब, ग्रामीण लोक उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. परिणामी समाजामध्ये पुन्हा एकदा उच्चशिक्षित आणि अशिक्षित अशा पद्धतीचा भेद वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. शिक्षण परवडत नसल्यामुळे शाळा गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत होत जाईल. यातून बालमजुरी तसेच गुन्हेगारीस चालना मिळेल.हे असेच चालू राहिले तर बहुजनातील मुला मुलींना उच्च शिक्षणाची दारे अपोआप बंद होतील. यासाठी पुन्हा एकदा छत्रपती शाहूंच्या शैक्षणिक विचारांची आणि त्यांनी केलेल्या शिक्षणविषयक सुधारणांची पुनरावृत्ती होणे किती गरजेचे आहे याची जाणीव होते. आपला देश महासत्ता करायचा असेल आणि फुले, शाहू, आंबेडकर, महात्मा गांधी आणि डॉ कलामांच्या स्वप्नातील भारत सत्यात आणावयाचा असेल तर शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांची अंमलबजावणी होणे ही आजच्या काळाची अनिवार्यता आहे असेच म्हणावेसे वाटते.

**संदर्भ**

1) साळुंखे नानासाहेब,(२००६), शाहूंच्या आठवणी, वृशाली प्रकाशन, कोल्हापूर.

2) सूर्यवंशी कृ. गो. (१९८४), राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे.

3) पवार जयसिंगराव,(२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,

4) येडेकर शाम, राजर्षी एक व्यक्तीदर्शन, प्रकाशक सतीशचंद्र येडेकर, कोल्हापूर.

5) पचिंद्र श्रीराम ग, (२००५), शाहू, नरेशचंद्र काठोळे प्रकाशन, पुणे.

6) मोरे गिरीश, (२००९), राजर्षी शाहू विचार व कार्य, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर.

7) करपे आर. एन., (२०१२), राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

8) भगत रा. तू.(२००३), राजर्षी शाहू छत्रपती, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर.